# शिक्षण विभाग

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

## प्राथमिक शाळा (Primary School):-

- महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा
- शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९(R.T.E)
- इ.१ ली साठी नवीन प्रवेश घेण्याकरीता कागदपत्रे
- प्राथमिक शाळेतील प्रवेशाची कार्यपध्दती
- आर.टी .ई नुसार २५ टक्के आरक्षणामधून प्रवेश व प्रवेशासाठी कागदपत्रे
- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम
- शाळाबाहय बालकांना प्रवेश
- विशेष मार्गदर्शन, प्रवेश घेण्यासाठीचे वय
- माध्यम बदलून दूस-या माध्यमात प्रवेश
- पाल्यास त्याच वर्गात पून्हा बसवणे
- विद्यार्थाना मोफत पुरविले जाणारे साहित्य
- शालेय पोषण आहार
- शाळा सोडल्याचा दाखला मिळण्यासाठी प्रक्रिया
- प्राथमिक शाळेतील विध्दार्थ्यांना प्रोत्साहनपर योजना
- आधार कार्ड विद्वार्थ्राकरिता
- बोनाफाईड सर्टिफिकेट
- विद्यार्थाना नांव,जात,जन्मतारीख इ.बाबीमध्ये बदल
- अपंग /विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी सोयी सुविधा
- मनपा शाळेत शिक्षणासाठी फी
- माहितीच्या अधिकारात अर्ज
- इंग्रजी माध्यमाच्या शाळा
- इ.४ थी व ७ वी शिष्यवृत्ती
- खाजगी प्राथ्रमिक शांळामध्ये फी
- खाजगी प्राथमिक शांळाबदल तक्रार

# महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा

- **महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्राथमिक स्तरावर मनपाच्या प्राथमिक,जिल्हा परिषद,केंद्रीय शाळा, खाजगी अनुदानित,खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित माध्यमनिहाय किती शाळा आहेत?**

| Sr. No. | Type of schools with classes | Govt. | ZP | MC | Pvt Aided | Pvt. Unaided | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 to 4/5 | 0 | 15 | 7 | 62 | 29 | **113** |
| 2 | 1 to 5/6/7 | 0 | 16 | 8 | 100 | 23 | **147** |
| 3 | 1 to 10/12 | 1 | 0 | 0 | 1 | 2 | **4** |
| 4 | 5 to 10/12 | 0 | 1 | 0 | 50 | 21 | **72** |
| 5 | 8 to 10/12 | 0 | 4 | 2 | 24 | 10 | **40** |
| | **Total** | **1** | **36** | **17** | **237** | **85** | **376** |

व्यवस्थापनिहाय विद्यार्थी संख्या: (UDISE 2015-16) नुसार

| | ***Category*** | ***Govt.*** | ***Z.P.*** | ***M. Corp.*** | ***M. Coun.*** | ***Cantt. Board*** | ***PA*** | ***PUA*** | ***Total*** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ***Total 1st to 8th*** | Boys | **180** | **2152** | **1009** | | | **41605** | **12101** | **57,147** |
| | Girls | **120** | **2060** | **1161** | | | **36727** | **7678** | **47,752** |
| | **Total** | **300** | **4,212** | **2,170** | | | **78,332** | **19,779** | **1,04,899** |
| | SC-Boys | **27** | **826** | **368** | | | **6966** | **1597** | **9784** |
| | SC-Girls | **19** | **810** | **412** | | | **8176** | **1064** | **10481** |
| | ST-Boys | **18** | **127** | **11** | | | **1010** | **580** | **1746** |
| | ST-Girls | **16** | **111** | **5** | | | **784** | **354** | **1270** |
| | **Minority-Boys** | **75** | **1068** | **774** | | | **19721** | **3891** | **25529** |
| | **Minority-Girls** | **42** | **951** | **856** | | | **20141** | **2318** | **24308** |
| | BPL Boys | **0** | **124** | **37** | | | **143** | **20** | **324** |
| | BPL Girls | **0** | **76** | **56** | | | **126** | **17** | **275** |

## ● शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९(RTE)

**प्रश्नः- बालकांचा मोफत व सत्कीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ (RTE) नुसार प्राथमिक शाळांमध्ये किमान कोणत्या भौतिक सुविधा असणे आवश्यक आहे ?**

उत्तरः- बालकांचा मोफत व सत्कीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ (RTE) नुसार प्राथमिक शाळांमध्ये खालील दहा भौतिक सुविधा असणे आवश्यक आहे.

१. इमारत
२. प्रत्येक शिक्षकास वर्ग खोली
३. मुलींसाठी स्वतंत्र स्वच्धतागृह
४. खेळाचे मैदान
५. किचन शेड
६. मुख्याध्यापक कार्यालय
७. मुलांसाठी स्वतंत्र स्वच्धतागृह
८. पिण्याच्या पाण्याची सुविधा
९. रॅम्प
१०. संरक्षण भिंत

**भौतिक सुविधा (UDISE 2015-16) नुसार**

| No. of Schools | Girls toilet | | Boys toilet | | Water | | Ramp | | Boundary wall/ Fencing | | Play Ground | | Library | | building | | hmroom | | kitchd | | Class room | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Ava. | Not Available | Ava. | Not Available | Ava. | Not Available | Ava. | Not Available | Ava. | Not Available | Ava. | Not Available | Ava. | Not Available | Available | Not Available | Available | Not Available | Available | Not Available | Available | Not Available |
| 376 | 372 | 4 | 372 | 4 | 372 | 4 | 336 | 40 | 323 | 53 | 308 | 68 | 339 | 37 | 376 | 0 | 322 | 54 | 216 | 160 | 173 | 203 |

## ● प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमः-

*» महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत शाळेतील एकही मुल अप्रगत राहणार नाही यासाठी विशेष लक्ष केंद्रीत केले असून विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्ता पुर्ण शिक्षण प्राप्त व्हावे यासाठीमहानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये ज्ञानरचनावादानुसार अध्यापन करुन घेण्यात येत आहे.*

*महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये या शैक्षणिक वर्षापासून e-Learning संच बसविण्यात आले असून त्यानुसार अध्यापन करुन घेण्यात येत आहे. म्हणजेच महापालिकेच्या शाळा हया Digital होत असून विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण व दर्जेदार शिक्षणाचा लाभ मिळत आहे.*

**प्रश्नः- बालकांचा मोफत व सत्कीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ ची प्रत पाहण्यासाठी कोठे उपलब्ध होईल?**
उत्तर:- शासनाच्या www.mpsp.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- **इयत्ता १ ली साठी नवीन प्रवेश घेण्याकरीता कागदपत्रे :**

**प्रश्नः-मनपा व खाजगी प्राथमिक शाळेत इ.१ लीसाठी नवीन प्रवेश घेण्याकरीता कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता लागते?**
उत्तर:- शाळा प्रवेशाच्या वेळी बालकांच्या जन्म नोंदणीचा दाखला किंवा पालकांचे साध्या कागदावर जन्म नोंदणी बाबतचे प्रतिज्ञा पत्र आणि शाळा प्रवेशाचा अर्ज, या कागदपत्राची आवश्यकता असते.

- **प्राथमिक शाळेतील प्रवेशाची कार्यपध्दती :**

**प्रश्नः- प्राथमिक शाळेतील प्रवेशाची कार्यपध्दती काय आहे?**
उत्तर:- प्राथमिक शाळेत प्रवेश घेताना वरील कागदपत्रे सादर करावी लागतात. शिवाय रिक्त जागांच्या एवढे किंवा त्यापेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास अर्ज केलेल्या सर्व बालकांना प्रवेश दिला जातो, मात्र प्रवेश द्यावयाच्या अर्जाची संख्या जास्त असल्यास कोणतीही प्रवेश परीक्षा घंतली जात नाही, मात्र शालेय व्यवस्थापन समिती, सर्व पालकं, यांचे समक्ष, समक्ष सोडत (लॉटरी ) पध्दतीने प्रवेश पात्र बालकांची नांवे निश्चित केली जातात.

- **आर.टी.ई नुसार २५ टक्के आरक्षणामधून प्रवेश**

**प्रश्नः- आर.टी.ई नुसार २५ टक्के आरक्षणामधून प्रवेश कोणत्या वर्गात प्रवेश दिला जातो? सदर वर्गाची एकुण प्रवेश क्षमता किती?**
उत्तर:-बालकांचा मोफत व सत्कीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने १ एप्रिल-२०१२ मध्ये एक अधिसूचना जाहीर केली आहे, त्यानुसार :प्राथमिक शाळेतील प्रथम स्तर ज्या वर्गापासून सुरू होतो त्या, नर्सरी, एल.के.जी, यू.के.जी वा १ ली च्या वर्गाच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागांवर वंचित व दुर्बल घटाकातील मुलांना मोफत प्रवेश दिला जातो.

**प्रश्नः-२५ टक्के मोफत जागेवर प्रवेश कोणत्या प्रवर्गातील / संवर्गातील मुलांना दिला जातो ?**
उत्तर:- १) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती मधील सर्व विद्यार्थांना
२) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग गटातील रु. १,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील पाल्यांना.
३) राज्य शासनाने विर्निर्दिष्ट केलेल्या अल्पसंख्यांकासह इतर बालके (मुलींना प्राधान्य) २५ टक्के आरक्षणानुसार द्यावयाच्या प्रवेशाच्या अर्जाचा नमुना कोठे मिळेल?- प्रवेशाचा अर्ज, ज्या ठिकाणी प्रवेश द्यावयाचा आहे. त्या संबंधीत शाळेमध्ये किंवा www.mpsp.org.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेता येईल.

## • २५ टक्के आरक्षणानुसार प्रवेशासाठी कागदपत्रे:

**प्रश्न: २५ टक्के आरक्षणानुसार प्रवेश अर्ज भरतांना त्यासोबत कोणकोणती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे?**

उत्तर: २५ टक्के आरक्षणानुसार प्रवेश अर्ज भरतांना अर्जासोबत कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१. वंचित गटातील बालकांसाठी (अनुसूचित जमाती) निवासाचा पुरावा, उपजिल्हाधिकारी किंवा इतर कोणताही सक्षम प्राधिकारी यांच्या दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसुली अधिकाऱ्यांने दिलेले बालक किंवा मातापिता अथवा पालक यांचे जातीचे प्रमाणपत्र.

२. दुर्बल गटातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग बालकांसाठी - निवासाचा पुरावा उपरोक्त प्रमाणे जातीचे प्रमाणपत्र तसेच तहसिलदारांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिकाऱ्यांने पालकांना दिलेले उत्पन्नाचे रु. १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष) प्रमाण्पत्र.

३. राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या धार्मिक अल्पसंख्यांकासह इतर व दुर्बलबाबत पुरावा तसेच तहसिलदाराच्या दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसुल अधिकाऱ्यांने पालकांना दिलेले रु. १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष) उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

**प्रश्न :प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त अर्ज आल्यास कोणत्या मुलांना प्रवेश दिला जातो?**

उत्तर : यासाठी शाळांना प्रवेशा बाबत जाहीर प्रकटन करून अर्ज स्वीकारण्याचा कालावधी, प्राप्त अर्जांची यादी, मुलाखतीचा दिनांक इ. चे नियोजन करून जाहीर करणे आवश्यक असून, शिक्षण विभागाचा प्रतिनिधी, संस्थेचा प्रतिनिधी, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य व सर्व पालकांसमक्ष सोडत (लॉटरी) पध्दतीने प्रवेशासाठी निवड करणे आवश्यक आहे.

## • शाळाबाहय बालकांना वयानुरूप प्रवेश:

**प्रश्न: शाळाबाहय बालकांना शैक्षणिक प्रवाहात दाखल करण्याकरीता RTE नुसार कोणतही तरतूद करण्यात आली आहे? व त्यासाठी कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे?**

उत्तर:- शाळाबाहय बालकांना शैक्षणिक प्रवाहात दाखल करण्याकरीता शाळा प्रवेशाचा अर्ज व त्यासोबत जन्म नोंदणी दाखला किंवा जन्म नोंदणी बाबतचे पालकांचे साध्या कागदपत्रावर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**प्रश्न: शाळाबाय मुलांना शैक्षणिक वर्गात प्रवेश देतांना कोणत्या वयोगटातील मुलांना प्रवेश दिला जातो?**

उत्तर: ६ ते १४ वयोगटातील मुलांना प्रवेश दिला जातो व विशेष गरजा असणाऱ्या मुलांना वयाच्या १८ वर्षापर्यंत प्रवेश दिला जातो.

**प्रश्न : वय जास्त असेल तरीही पहिलीतच प्रवेश घ्यावा लागेल काय ?**

उत्तर : नाही, त्यास वयानुरूप योग्य इयत्तेत प्रवेश देवून मागील इयत्तांचा अभ्यास "विशेष मार्गदर्शनाव्दारे" पूर्ण केला जातो.

- **विशेष मार्गदर्शन:-**

**प्रश्न:- अध्ययनात मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांना / सम कक्ष वर्गात प्रवेश घेतलेले विद्यार्थी यांच्यासाठी कोणत्या स्वरुपाचे विशेष मार्गदर्शन केले जाते?**

उत्तर:- या विद्यार्थ्यांकरीता शालेय इमारतीत शाळा भरण्यापूर्वी १ तास व शाळा सुटल्यानंतर १ तास विशेष मार्गदर्शन शिक्षकांकरवी केली जाते.

- **प्रवेश घेण्यासाठीचे वय:**

**प्रश्न:-प्राथमिक शाळेत इ.पहिलीत प्रवेश घेण्यासाठी मुलाचे वय किती असणे आवश्यक आहे?**

उत्तर:- प्राथमिक शाळेत इ.पहिलीत प्रवेश घेण्यासाठी मुलाचे वय ६ वर्ष असणे आवश्यक आहे.

- **माध्यम बदलून दूस-या माध्यमात प्रवेश**

**प्रश्न:-माध्यम बदलून दूस-या शाळेत प्रवेश घ्यावयाचा असल्यास कोणत्या वर्गात प्रवेश दिला जातो?**

उत्तर:-माध्यम बदलून दूस-या शाळेत प्रवेश घ्यावयाचा असल्यास सध्या शिकत असलेल्या इयत्तेतच प्रवेश दिला जातो.

- **पाल्यास त्याच वर्गात पून्हा बसवणे**

**प्रश्न:-पालकांनी विंनती केल्यास पाल्यास त्याच वर्गात पून्हा बसवता येईल का?**

उत्तर:-कोणत्याही विद्यार्थ्याला त्याच वर्गात बसवता येणार नाही.

- **विद्यार्थ्यांना मोफत पुरविले जाणारे साहित्य**

**प्रश्न:-मनपा प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थाना कोणते साहित्य मोफत पुरविले जाते ?**

उत्तर:- खालील साहित्य/सुविधा मोफत पुरविल्या जातात -

१) पाठ यपुस्तके, स्वाध्यायपुस्तिका (दरवर्षी शासनाप्रमाणे) (इ. ८ वी पर्यंत)

२) शालेय गणवेश, सर्व मुली, एसी.एस.टी. ची मुले (इ. ८ वी पर्यंत)

३) मराठी व इंग्रजी तीन व चार रेघी शुध्द लेखन वहया

४) कंपासपेटी

५) पाढे लेखन वही

खाजगी प्राथमिक शाळेतील अनुदानित व अंशता अनुदानित विद्यार्थ्यांना शासनामार्फत पाठयपुस्तके,स्वाध्यायपुस्तिका वितरित केल्या जातात.

## • शालेय पोषण आहार

**प्रश्नः-मनपा, खाजगी अनु. शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्या स्वरूपात शालेय पोषण आहार दिलाजातो?**

उत्तरः- शालेय पोषण आहार खालील प्रमाणे दिला जातो.

इयत्ता १ ते ५ साठी प्रति विद्यार्थी प्रति दिवस १०० ग्रॅम तांदूळ व इयत्ता ६ ते ८ साठी प्रति विद्यार्थी प्रति दिवस १५० ग्रॅम तांदूळ.

| अ.क्र | वार | द्यावयाचे पदार्थ |
|---|---|---|
| 1 | सोमवार | दाळ तांदूळाची खिचडी/मसाले भात |
| 2 | मंगलवार | मटकीउसळ युक्त भात |
| 3 | बुधवार | वाटानायुक्त मसाले भात/पुलाव |
| 4 | गुरुवार | मटकीउसळ युक्त भात/पुलाव |
| 5 | शुक्रवार | वरणभात/सांभार भात |
| 6 | शनिवार | मटकी उसळयुक्तभात/पुलाव |

## • शाळा सोडल्याचा दाखला मिळण्यासाठी प्रक्रिया

**प्रश्नः-शाळा सोडल्याचा दाखला मिळण्यासाठी काय प्रक्रिया आहे?**

उत्तरः-मुख्याध्यापकांचा नावे साध्या कागदावर अर्ज करावा.त्यावर ज्याचा दाखला हवा आहे त्या विद्यार्थ्याचे नाव,इयत्ता, शाळा सोडल्याचे वर्ष इत्यादी नमूद करावे.

**प्रश्नः-मनपा प्राथमिक शाळांमध्ये शाळा सोउल्याचा दाखला मिळणेकामी किती फी आकारली जाते?**

उत्तरः- विद्यार्थ्यांला शाळा सोडल्याचा दाखला देतांना (प्रथम किंवा दुबार प्रत) कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

**प्रश्नः- प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारच्या प्रोत्साहनपर योजना आहेत?**

| अ.क्र | योजनेचे नांव | लाभार्थी | कोणत्या कालावधी साठी | दर |
|---|---|---|---|---|
| १ | अल्पसंख्यांक विद्यार्थांसाठी मेट्रीकपूर्व शिष्यवृत्ती | विद्यार्थांसाठी | शैक्षणिक वर्षासाठी | प्रति विद्यार्थी १००० रु प्रमाणे |
| २ | अल्पसंख्यांक विद्यार्थांना मोफत पाठयपूस्तके | विद्यार्थांसाठी | शैक्षणिक वर्षासाठी | मोफत |

| अ.क्र | योजनेचे नांव | लाभार्थी | कोणत्या कालावधी साठी | दर |
|---|---|---|---|---|
| १ | उपस्थिती भत्ता -इ.५ ते ७ वी | फक्त SC ST मुली | शैक्षणिक वर्षातील उपस्थितीनूसार प्रतिदिन | ०२-०० प्रमाणे |
| २ | गणवेश इ.१ते ८ वी | १.सर्व मुली व SC,ST,BPL च्या विद्यार्थांना SSA अंतर्गत मोफत गणवेश पुरविण्यात येते. २.उर्वरीत विद्यार्थांना मनपा फंडातून मोफत गणवेश पुरविण्यात येते. | शैक्षणिक वर्षातील विद्यार्थास | २०० प्रमाणे २ गणवेश प्रत्येकी विद्यार्थास |
| ३ | सावित्रीबाई फुले उपस्थिती भत्ता | फक्त मुली SC ST -इ.५ ते ७ वी | शैक्षणिक वर्षातील मुलीसाठी | प्रति मुलीस ६०० रू प्रमाणे |

- **विद्यार्थाकरिता आधार कार्ड**

**प्रश्नः-आधार कार्ड विद्यार्थाकरिता काढणे गरजेचे आहे काय? त्यासाठी कोणकोणती कागदपत्रे आवश्यक आहेत?**

उत्तरः-शासनाच्या विविध शिष्यवृत्ती व सवलतीचा लाभ मिळणेकरिता आधार कार्डचा क्रंमाक आवश्यक आहे.३ वर्षापेक्षा जास्त वयाच्या बालकांस आधार कार्ड मिळू शकते. त्यासाठी विद्यार्थाचा फोटो असलेले शाळेच्या मुख्याध्यापकाने दिलेल्या बोनाफाईड सर्टिफिकेट,निवासाचा पुरावा म्हणून रेशन कार्ड इत्यादी कागदपत्रासह आधार केंद्रावर अर्ज करावा.

- **बोनाफाईड सर्टिफिकेट**

**प्रश्नः- बोनाफाईड सर्टिफिकेट कसे मिळते?**

उत्तरः- शाळेत शिकणा-या कोणत्याही विद्यार्थ्याला संबधीत शाळेच्या मुख्याध्यापकांकडे साध्या कागदावर अर्ज करून सदरचे सर्टिफिकेट मिळविता येते.

- **विद्यार्थाना नाव,जात,जन्मतारीख इ.बाबीमध्ये बदल**

**प्रश्नः- विद्यार्थाना नाव,जात,जन्मतारीख इ.बाबीमध्ये बदल करावयाचे असल्यास काय करावे?**

उत्तरः- जे विद्यार्था सध्या शाळेत शिकत आहेत त्यांच्या बाबतच हा बदल करता येईल.त्यासाठी मनपा /खाजगी /प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांच्या नावे अर्ज,सोबत विहित नमुन्यातील अर्ज ,ज्या बाबीमध्ये बदल करावयाचा आहे त्याबदलाबाबत अधिकृत पुरावे,१००/-च्या स्टॅपपेपर वर प्रतिज्ञापत्र मुख्याध्यापकांकडे सादर करावीत.संबधीत मुख्याध्यापक त्यांच्या शिफारशीसह प्रशासन अधिकारी,नांदेड मनपा यांच्याकडे कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठवितात. शाळा सोडल्यांनतंर मात्र असा बदल करता येत नाही.

- **विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (अपंग) सोयी सुविधा :**

**प्रश्नः-महापालिका कार्यक्षेत्रातील अपंग असलेल्या मुलांसाठी कोणत्या विशेष गरजा सोयी सुविधा दिल्या जातात ?**

उत्तरः- सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विद्यार्थ्यांची NRHM व मनपा मार्फत मोफत आरोग्य तपासणी केली जाते. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत अपंग समावेशित शिक्षण उपक्रम सुरू असून दर वर्षी अशा विद्यार्थाचे सर्वक्षण (शोध) होऊन तज्ञ डॉक्टरांकडून शारिरिक तपासणी केली जाते व त्यामध्ये अपंगत्व आढळणा-या बांलकाना गरजेनुसार ALIMCO मार्फत मापे घेवून मुलांना मोफत साहित्य पुरविले जाते. तसेच दुर्धर आजार (जसे हार्ट, कॅन्सर, इ.) सोडून इतर सर्व शस्त्रक्रिया केली जातात.

| | |
|---|---|
| १) तीन चाकी सायकल | २) कॅलिपर्स |
| ३) व्हिल चेअर | ४) मोफत चष्मे |
| ५) बूट | ६) कमोड चेअर |
| ७) श्रवणयंत्र | ८) कुबडया |

**तसेच खालील शस्त्रक्रिया सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत करण्यात येतात.**

| | | |
|---|---|---|
| १) कर्णदोष | २) अंध | |
| ३) अस्थिव्यंग | ४) बहुविकलांग | ५) सेरेबल पाल्सी |

- या शिवाय अशा बालकांना शाळेत विना अडथळा प्रवेश करता यावा.यासाठी प्रत्येक शाळेच्या इमारतीत प्रवेश व्दाराजवळ उताराचा रस्ता (रम्पॅ)अनिवार्य केलेला आहे.

- **मनपा शाळेत शिक्षणासाठी फी :**

**प्रश्नः-मनपा शाळेत शिक्षणासाठी ,प्रवेशासाठी किती फी आकारली जाते?**

उत्तर:- मनपा शाळेत कोणत्याही प्रकारची फी आकारली जात नाही.सर्वाना सोयीसुविधा मोफत पुरविल्या जातात.

- **माहितीच्या अधिकारात अर्ज :**

**प्रश्नः-प्राथमिक शाळेविषयी माहिती मिळविण्यासाठी माहितीच्या अधिकारात  कोणाकडे अर्ज करावा लागतो?माहिती न दिल्यास कोणाकडे अपिल करावे?**

उत्तर:-विहीत नमून्यात अर्ज करून संबधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडे माहिती  मागवावी.माहिती न मिळाल्यास प्रशासन अधिकारी यांच्याकडे अपील करावे.

- **खाजगी प्राथमिक शाळांमध्ये फी :**

**प्रश्नः-खाजगी प्राथमिक शाळांमध्ये फी आकारणी कशी केली जाते?**

उत्तर:- १)अनुदानित प्राथमिक शाळेत शासन निर्णयानुसार फी आकारली जात नाही.

२) विना अनुदानित प्राथमिक शाळेत शासनमान्य अल्प दराने फी आकारली जाते.मात्र शुल्क माफीस पात्र विद्यार्थाकडून फी घेतली जात नाही.

३)  खाजगी कायम विना अनुदानित प्राथमिक शांळामध्ये पालक शिक्षक संघ/सक्षम अधिकारी यांनी मान्य केलेल्या बाबीवर व मान्य दराने फी आकारणी करणे अपेक्षित आहे.

- **खाजगी प्राथमिक शाळांबदल तक्रार :**

**प्रश्नः- खाजगी प्राथमिक शाळांबदल तक्रार असल्यास ती कोणाकडे करावी?**

उत्तर:- खाजगी प्राथमिक शाळांबदल तक्रार असल्यास प्रकरण पुढील अधिकारी /प्राधिकारी यांच्याकडे करता येईल.

१)संबधित शाळा मुख्याध्यापक.

२)संबधित संस्था.

३)शिक्षण अधिकारी प्राथ(जिल्हा परिषद नांदेड).

४)शिक्षण उपसंचालक लातूर विभाग लातूर.